MHBI060002062026

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र ६८/२०२६ मधील**
**नि.क्र. १ खालील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र (Heirship certificate)मिळणेकरीता दाखल करण्यात आला आहे.

२. अर्जदार यांनी कथन केले आहे की, मयत चंद्रकांत वसंत मुंडे यांची अर्जदार क्र. १ ही पत्नी आहे, अर्जदार क्र. २ हा मुलगा आहे व अर्जदार क्र. ३ ही आई आहे. चंद्रकांत वसंत मुंडे , रा. सनगाव, ता. अंबाजोगाई, जि. बीड हे दिनांक १४.१२.२०२५ रोजी मयत झाले आहेत. मयत चंद्रकांत वसंत मुंडे यांना अर्जदारांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाहीत. त्यांच्या मृत्युनंतर अर्जदारांना शासकीय, निमशासकीय व इतर कामाकरीता वारस प्रमाणपत्र (Heirship certificate) आवश्यक आहे.

३. अर्जदार यांनी अर्जाच्या पुष्ठयर्थ दिनांक ०८.०२.२०२६ रोजी ''दैनिक न्याय टाईम्स '' या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आलेली हरकत नोटीस (निशाणी क्र. १२ ) दाखल केली. सदर हरकत नोटीस (निशाणी क्र. १२) यास कोणाचीही हरकत आलेली नाही. त्यामुळे सदर अर्ज हा विना आव्हानीत राहीला आहे. बेलीफ

अहवाल निशाणी क्र. ०९ पाहता, ग्रामपंचायत कार्यालय, सनगाव, ता. अंबाजोगाई, जि. बीड व तहसिल कार्यालय, अंबाजोगाई यांच्या कार्यालयातील बोर्डवर जाहीर नोटीसा डकवण्यात आल्या. अर्जदार यांनी त्यांच्या आधारकार्डच्या साक्षांकीत प्रती दाखल केल्या आहेत. चंद्रकांत वसंत मुंडे यांचा मृत्युचा दाखला (निशाणी क्र. ०६) वर दाखल केला आहे. अर्जदार क्र. ०१ यांनी त्यांचे पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र. १३ वर दाखल केले आहे. तसेच अर्जदार यांनी पुरावा बंद झाल्याची पुरशीस निशाणी क्र. १६ वर दाखल केली आहे.

४. अर्जदारांच्या विधिज्ञाचे म्हणणे ऐकले. अर्जदारांच्या विधिज्ञातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला आहे की, मयत चंद्रकांत वसंत मुंडे यांच्या वारसांना त्यांच्या मृत्युनंतर शासकीय व नियमशासकीय कार्यालयीन कामासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

५. अर्जास विहीत कालावधीमध्ये तसेच आजपर्यंत अर्जदाराच्या अर्जातील मागणीस कोणाचीही हरकत अथवा आक्षेप दाखल झालेला नाही. करीता, अर्जदारांचा पुरावा विना आव्हानात्मक राहीलेला आहे. अर्जदारांनी ते मयताचे कायदेशीर वारस असल्याचे न्यायालयासमोर शपथेवर सांगितले आहे. त्यांचा पुरावा अविश्वासार्ह आहे असे दर्शविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा याकामी दाखल नाही. अभिलेखावरील कागदपत्र आणि अर्जदारांचा तोंडी पुरावा विचारात घेतला असता

असे दिसुन येते की, अर्जदार हे वारस प्रमाणपत्र घेण्यास पात्र आहेत. सबब अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे या निष्कर्षाप्रत मी येवून खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## **<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| १) | सदरचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |
| २) | मयत चंद्रकांत वसंत मुंडे यांच्या पश्चात अर्जदार क्र. १ आकांक्षा चंद्रकांत मुंडे, अर्जदार क्र. २ वेदांत चंद्रकांत मुंडे व अर्जदार क्र. ३ विजयमाला वसंत मुंडे हे मयत चंद्रकांत वसंत मुंडे यांचे वारस असल्याबाबतचा वारस दाखला बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट१८२७ चे परिशिष्ठ ब प्रमाणे अर्जदार यांनी योग्य ते मुद्रांक शुल्क दिल्यानंतर देण्यात यावा. |

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by PRIYANKA JAYAPRAKASH LIGADE
Date: 2026.04.10 18:46:16 +0300

स्थळ–अंबाजोगाई
दिनांक १०.०४.२०२६

(प्रियंका ज.लिगाडे )
२रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
अंबाजोगाई

**प्रमाणपत्र**

मी अभिकथन करतो की, या पी.डी.एफ. वरुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयातील शब्द–नि–शब्द हे मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| **लघुलेखक ग्रेड–३** | **कुरूंद बी. एस.** |
| न्यायालयाचे नाव | २रे सह दिवाणी न्यायालय<br>क. स्तर, अंबाजोगाई |
| न्यायनिर्णयाची तारीख | **१०.०४**.२०२६ |
| न्यायनिर्णयावर पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | **१०**.०४.२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | **१०**.०४.२०२६ |

(कुरूंद बी. एस.)
लघुलेखक ग्रेड–२
२रे सह दिवाणी न्यायालय क. स्तर,
अंबाजोगाई